# वैतरणा धरणात बुडालेल्या दोघांचे मृतदेह सापडले

## बचाव पथकाकडून तिसऱ्या पर्यटकाचा शोध सुरू

**घोटी** : इगतपुरी तालुक्यातील वैतरणा धरणाच्या पाणलोट क्षेत्र परिसरात पर्यटनासाठी आलेले मुंबईचे तीन पर्यटक बुडाल्याची घटना दोन दिवसांपूर्वी घडली. यातील दोन पर्यटकांचे मृतदेह बचाव पथकाने शोधले असून अजूनही तिसऱ्या पर्यटकाचा शोध सुरू आहे. मृतांमध्ये मुफदल सैफुद्दीन हरहरवाला (५२, रा. सैफीक पार्क, चर्चरोड, अंधेरी) व सिद्धेश दिलीप गुरव (२३, रा. लालबाग, मुंबई) यांचा समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी सायंकाळच्या सुमारास सिद्धेश गुरव याचा मृतदेह बचाव पथकाच्या हाती लागला, तर मुफदल सैफुद्दीन हरहरवाला यांचा मृतदेह तब्बल ४८ तासांच्या शोध मोहिमेनंतर मंगळवारी बचाव पथकाला सापडला. मात्र, तिसऱ्या पर्यटकाचा बचाव पथकाकडून अजूनही शोध सुरू आहे.

रविवारी सकाळच्या सुमारास मुंबई येथून आलेले १४ ते १५ पर्यटक वैतरणा धरणात पोहायला उतरले होते. त्यापैकी तिघे जण बुडाल्याने गत दोन दिवसांपासून त्यांचा शोध सुरू होता. त्यामुळे मागील दोन दिवसांपासून पाण्यात बुडालेल्या पर्यटकांचे शोध कार्य सुरू होते. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीतील पाण्याचा वेग अधिक असल्याने शोधकार्यात बचाव पथकाला अडचणींचा सामना करावा लागला.

धरणांचा तालुका अशी ओळख असलेल्या इगतपुरी तालुक्यात पावसाळ्यात इगतपुरीसह वैतरणा, दारणा, भावली, भाम, त्रिंगलवाडी आदी धरण परिसरात मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक आदी ठिकाणांहून मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. मात्र, धरण परिसरातील धोकादायक ठिकाणांसह अपघात प्रवण स्थळांवर पर्यटकांसाठी कोणत्याही प्रकारची धोक्याची सूचना देणारे फलक लावलेले नाहीत. त्याचप्रमाणे धरण क्षेत्रात सुरक्षा रक्षकही नेमलेले नाहीत. त्यामुळे या ठिकाणांवर सुरक्षेच्या उपाययोजना होण्याची गरज व्यक्त होत आहे.

# कोस्टल रोडला धोका नाही, बोगदे वॉटरप्रूफ होणार



छाया : दीपक साळवी

(पान १ वरून) दिली. यावेळी पालिका आयुक्त भूषण गगरानी उपस्थित होते. मुंबई महापालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या कोस्टल रोडचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. सध्या ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पात प्रिन्सेस स्ट्रिट फ्लायओव्हर ते वरळी सी लिंक असा १०.५८ किमी लांबीचा कोस्टल रोड बांधण्यात आला आहे. तब्बल १४ हजार कोटी रुपये खर्च करून कोस्टल रोड बांधण्यात आलेल्या या मार्गाचे वरळी ते मरीन ड्राइव्ह असा एक मार्गाचा टप्पा ११ मार्च रोजी वाहनचालकांसाठी खुला करण्यात आला आहे. ही लेन सुरू झाल्यानंतर दोन महिन्यांतच बोगद्यातून गळती लागल्याचे समोर आले आहे. या मार्गावर आताच भेगा पडल्याचे समोर आल्यानंतर भुयारी मार्गाच्या सांध्यांमध्ये गळती होत असल्याचा प्रकारही समोर आला आहे. पालिकेने तत्काळ गळती रोखण्याचे काम सुरू केले असून लवकरच कायमस्वरूपी गळती दूर केली जाणार आहे. कोस्टल रोडच्या बोगद्यांमधील गळती रोखण्यासाठी जॉइंटमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेले 'ग्राऊंटिंग इंजेक्शन' दिले जाणार असून यामुळे कोस्टल रोडचे बोगदे आता 'वॉटरप्रूफ' होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. दरम्यान, कोस्टल रोडच्या बोगद्यात लागलेल्या गळतीमुळे प्रकल्पाला कोणताही धोका नाही. ही गळती कायमस्वरूपी दूर करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने डागडुजी करून कायमस्वरूपी उपाययोजना केली जाणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

### वाहतुकीवर कोणताही परिणाम नाही

कोस्टल रोडच्या बांधकामात २.०७२ किमीचे दोन महाकाय बोगदे जमिनीखाली ७० मीटरवर खोदण्यात आले आहेत. यामध्ये जोडकामाच्या सांध्यांमध्ये गळती झाल्याचे समोर आले आहे. मात्र पॉलिमर ग्राऊंटिंग इंजेक्शन दिल्यामुळे दोन्ही ठिकाणची गळती आणि तीन ठिकाणी झिरपणारे पाणी बंद झाले आहे. या गळतीमुळे कोस्टल रोडला कोणताही धोका नसून वाहतुकीवरदेखील कोणताही परिणाम झाला नसल्याचे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले.

# 'हिट ॲण्ड रन' सत्र सुरूच

(पान १ वरून) याला पुणे स्टेशन परिसरात सोडण्यासाठी चालले होते. पुणे-नगर रस्त्यावरील खराडी परिसरात दुचाकीस्वार फहाद, सहप्रवासी आदिल, अफान सिग्नलला थांबले होते. त्यावेळी नगरकडून पुण्याकडे निघालेल्या भरधाव ट्रकने दुचाकीला मागून धडक दिली. त्यात फहाद आणि आदिल चाकाखाली सापडले. सहप्रवासी अफान फेकला गेल्याने गंभीर जखमी झाला. चाकाखाली सापडलेल्या फहाद आणि आदिलला ट्रकने फरफटत नेले. त्यामध्ये दोघांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळाल्यावर पोलिसांचे पथक घटनास्थळी पोचले. त्यांनी ट्रकचालक गौतम याला ताब्यात घेतले. पुणे-नगर रस्त्याच्या परिसरात विशेषतः आयटी कंपन्यांमध्ये नोकरीला असणाऱ्या मुलांची आणि शिक्षणानिमित्त स्थायिक झालेल्या मुलांची संख्या मोठी आहे. ट्रक व तत्सम जड वाहनांच्या बेदरकार वाहतुकीचे ते बळी ठरतात. त्याच स्वरूपाच्या अपघातामध्ये सोमवारी दोघांना जीव गमवावा लागला.

# गुरमीत राम रहीम निर्दोष

(पान १ वरून) यानंतर राम रहीमचे अनेक अनुयायी दुरावले होते. रणजीत देखील व्यवस्थापक पदाचा राजीनामा देऊन कुटुंबासह डेऱ्यातून निघून गेला होता. हे पत्र रणजीतनेच त्याच्या बहिणीच्या माध्यमातून पाठवल्याचा राम रहीमला संशय होता. यानंतर एके दिवशी अचानक रणजीतची हत्या करण्यात आली. या हत्येमागे राम रहीम आणि त्याचे काही समर्थक असल्याचा सीबीआयचा आरोप होता. सीबीआयने सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारावर विशेष न्यायालयाने त्याला शिक्षा ठोठावली होती. या शिक्षेला त्याने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने त्याची निर्दोष मुक्तता केली.

# ईशान्य भारतात अतिवृष्टी, भूस्खलनाचे ३१ बळी

**ऐझॉल** : बंगालच्या उपसागरातील 'रेमल'चक्रीवादळाच्या तडाख्यानंतर ईशान्य भारतात मंगळवारी मुसळधार पावसाने हाहाकार माजवला. मिझोरामच्या दगडी खाणीतील भूस्खलन आणि पावसाशी संबंधित घटनांमध्ये दोन बालकांसह २२ जणांचा मृत्यू झाला तर ८ जण बेपत्ता झाले. नागालंडमध्ये चौघांचा मृत्यू झाला तर जवळपास ४० घरांचे नुकसान झाले. आसाममध्ये तीन जण दगावले तर १७ जण जखमी झाले. मेघालयात दोन जणांचा मृत्यू झाला तर ५०० हून अधिक जण जखमी झाले. मणिपूरमध्ये मुसळधार पावसामुळे अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली असून सामान्य जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले.

ऐझॉल शहराबाहेरील भागात स्थित दगडाच्या खाणीत सकाळी भूस्खलनाची घटना घडली. घटनेचे स्वरूप पाहता मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. नागालंडमध्ये विविध घटनांमध्ये ४० हून अधिक घरांचे नुकसान झाले. आसामला देखील अतिवृष्टीचा चांगलाच फटका बसला. अनेक काही भागांत भूस्खलनाच्या घटना नोंदविण्यात आल्या. एका शाळेच्या बसवर झाड पडल्याने १२ मुले जखमी झाले.

# पुन्हा कोरोनासारखी महामारी येणार

(पान १ वरून) आपण व्यक्त केली होती. यासाठी काही उपाय देखील सुचवले होते; परंतु २०२३ पर्यंत जी-७ देशांनी आपला सल्ला विसरल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. महामारीचा सामना करणे, हे युद्धाप्रमाणे असले पाहिजे. आपल्याकडे भक्कम सैन्यदल आहे. लागलीच युद्ध होईल, यासाठी हे सैन्यदल नाही, तर एक राष्ट्र म्हणून ही आवश्यक गोष्ट आहे. त्याचप्रमाणे महामारीकडे देखील पाहिले पाहिजे. महामारीचा सामना करण्यासाठी सैन्यदलाप्रमाणे अगोदरच सज्ज राहण्याची गरज वालेंस यांनी व्यक्त केली.

# अल्पवयीन मुलाच्या रक्ताचा दुसरा अहवालही निगेटिव्ह

(पान १ वरून) निष्पन्न झाले आहे. अपघातानंतर सकाळी नऊच्या सुमारास मुलाला ससून रुग्णालयात नेण्यात आले. तेथे अन्य चाचण्या पार पडल्यानंतर सकाळी अकराच्या सुमारास त्याच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले. ससून रुग्णालयातील प्राथमिक रक्त तपासणी अहवाल नकारात्मक (निगेटिव्ह) आला. काहीतरी काळेबेरे असल्याचे लक्षात आल्यावर त्याच दिवशी सायंकाळी सातच्या सुमारास औंध येथील जिल्हा रुग्णालयात अल्पवयीन मुलाचे रक्ताचे नमुने घेण्यात आले. रक्ताच्या नमुन्याचे अहवाल रविवार, २६ मे रोजी पोलिसांना मिळाले. दोन्ही अहवालांमध्ये मुलाच्या रक्तात मद्यांश आढळून आला नाही. कल्याणीनगर अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाच्या रक्ताऐवजी दुसऱ्याच व्यक्तीच्या रक्ताचा नमुना घेण्यात आल्याचे तपासात उघडकीस आले. बांधकाम व्यावसायिकाच्या मुलाला वाचवण्यासाठी रक्ताचे नमुने देणाऱ्या व्यक्तीचा पोलिसांकडून शोध सुरू करण्यात आला आहे.

कल्याणीनगर अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाच्या रक्तचाचणी नमुना अहवालात ससून रुग्णालयातील न्यायवैद्यक शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अजय तावरे आणि डॉ. श्रीहरी हाळनोर यांनी फेरफार केल्याची धक्कादायक माहिती तपासात उघडकीस आली आहे. याप्रकरणी डॉ. तावरे, हाळनोर यांच्यासह शवविच्छेदन विभागातील शिपाई अतुल घटकांबळे या तिघांना गुन्हे शाखेने सोमवारी अटक केली. त्यांना तपासासाठी येत्या ३० मेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. अगरवाल याच्या मुलाच्या रक्ताच्या नमुन्याऐवजी भलत्याच व्यक्तीच्या रक्ताचा नमुना डॉ. तावरे आणि डॉ. हाळनोर यांनी घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, त्या व्यक्तीचा शोध जारी करण्यात आला आहे. याप्रकरणी या डॉक्टरांविरुद्ध लाच घेऊन पुरावा नष्ट केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याबाबत ससून रुग्णालयाचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याचबरोबर औंध रुग्णालयातील चित्रीकरणाचीही पडताळणी सुरू आहे.

# ३ हजार पानांचे पुरवणी आरोपपत्र दाखल

(पान १ वरून) केली होती. यानंतर आफताबने तिच्या मृतदेहाचे ३५ तुकडे करून ते फ्रीजमध्ये ठेवले आणि हळूहळू त्यांची विल्हेवाट लावली. मृतदेहाचे तुकडे त्याने महरौलीलगतच्या जंगलात आणि आसपासच्या परिसरात फेकले. सलग १८ दिवस तो दररोज रात्री २ वाजता तुकडे जंगलात फेकण्यासाठी जात होता. श्रद्धाच्या वडिलांच्या तक्रारीवरून दिल्ली पोलिसांनी १२ नोव्हेंबर २०२२ रोजी आफताबला अटक केली. त्याच्याविरोधात भादंवि कलम ३०२ (हत्या) आणि कलम २०१ (गुन्ह्याचे पुरावे नष्ट करणे) या अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गतवर्षी जानेवारी महिन्यात पोलिसांनी याप्रकरणी ६,६२९ पानांचे आरोपपत्र दाखल केले होते. आफताब सध्या न्यायालयीन कोठडीत असून त्याने जामीन घेण्यास नकार दिला आहे.

# अकोला-चंद्रपूरमध्ये ऑरेंज अलर्ट

(पान १ वरून) नैर्ऋत्य मोसमी पावसाने (मान्सून) दक्षिण अरबी समुद्र आणि मालदीवचा काही भाग व्यापला आहे. तर, मान्सूनला पुढील तीन ते चार दिवसांत केरळमध्ये दाखल होण्याची अनुकूल परिस्थिती आहे. त्यामुळे ३१ मे रोजी मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. परिणामी, पुढील पाच दिवस कोकण-गोव्यात वादळी वाऱ्यासह पाऊस पडेल.

## उत्तर भारतात उष्णतेची लाट कायम; राजस्थानात सर्वाधिक

उत्तर भारतातील अनेक भागांत अजूनही उष्णतेची लाट कायम असून राजस्थानमध्ये काही भागात पाऱ्याने ५० अंश सेल्सिअसची पातळी गाठली आहे. राज्यातील चुरू येथे मंगळवारी ५०.५ अंश सेल्सिअस एवढी सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. त्याखालोखाल गंगानगर येथे ४९.४, पिलानी ४९, कोटा येथे ४८.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली. गुलाबी शहर म्हणून नावाजलेल्या जयपूरमध्ये ४६.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली.

### काही प्रमुख जिल्ह्यांतील कमाल तापमान

चंद्रपूर, वर्धा आणि ब्रह्मपुरी (४५.२), अमरावती (४४.६), गोंदिया (४४.२), नागपूर (४४), परभणी (४३.२), यवतमाळ (४३), अकोला, मालेगाव आणि वाशिम (४२.८), नांदेड (४२.६), छत्रपती संभाजीनगर (४२), बीड (४१.५) आणि बुलढाणा (४०).

# सिद्धेशसह प्रेयसीला जन्मठेप

(पान १ वरून) नंतर वडाळा खाडीत तिचा मृतदेह फेकल्याचे तपासात उघड झाले. या खटल्याची न्यायाधीश एम. जी. देशपांडे यांच्यासमोर सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने सोमवारी या दोघा आरोपींना दोषी ठरवत मंगळवारी भारतीय दंड संहिता कलम ३०२ अन्वये हत्येप्रकरणी जन्मठेप आणि अन्य विविध गुन्ह्यांत १० वर्षांच्या कारावासासह सहा हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## इ-निविदा सूचना
### क्र. ना.औ.वी.कें/२०२४-२५/०८

| अ. क्र. | निविदा क्र. / विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.)<br>इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३००००४८८२०<br>अकाऊंट | लेखा विभागात दैनंदिन कामासाठी मदत करण्याचा कंत्राट. | १३,०६,७७५/–<br>१६,५७०/– |
| २. | ३००००४८८१६<br>पीओजी | कोल मील फाइननेस टेस्ट पार पाडण्यासाठी सेवा भाडयाने घेण्यासाठी वार्षिक करार. | २९,५०,५२९/–<br>३३,००५/– |
| ३. | ३००००४८८१०<br>ईएम | संच क्र. ३/५ च्या भांडवल दुरूस्तीदरम्यान विविध सहाय्य करण्यासाठी कामाचा करार. | २,९८,७९३/–<br>६,४९०/– |
| ४. | ३००००४८८१२<br>ईएम | संच क्र. ३,४,५ आणि ओडीपी येथिल एल.टी. मोटर्स (क्षमता १६०केडब्ल्यु/४१५व्ही पर्यत) ओव्हरहॉलिंगसाठी वार्षिक कामाचा करार | २,१७,५४८/–<br>५,६७५/– |
| ५. | ३००००४८८२५<br>सिव्हिल | सन २०२३–२४ साठी एनटीपीएस कॉलनीतील निवासी गाळयांना रंग प्रदान करणे व रंगवण्याचे काम. | ३६,३३,१९५/–<br>३९,८४०/– |
| ६. | ३००००४८७७४<br>सेफ्टी/एफ एफ | एनटीपीएस प्लांट आणि कॉलनी प्रिमायसेसमध्ये सेफ्टी आणि फायर फायटिंग इन्स्ट्रक्शन रंगवण्याचे काम. | ६,८८,९४०/–<br>१०,४००/– |
| ७. | ३००००४८७८०<br>सेफ्टी/एफ एफ | सेफ्टी सेक्शनसाठी विविध ठिकाणी वेल्डिंग, कटिंग आणि रिपेअरिंगसाठीचा वार्षिक कामाचा करार. | २१,५४,४४०/–<br>२५,१००/– |
| ८. | ३००००४८४७२<br>डब्लुटीपी | क्लोरिन गॅस टोनर्सव्दारे डोझिंग करण्यासाठीचा द्विवार्षिक कामाचा करार. | ४२,०७,१४०/–<br>४५,६००/– |
| ९. | ३००००४८८६४<br>डब्लुटीपी | कुलिंग वॉटर सिस्टिम युनिट ४ येथे ऑनलाईन करोजन मॅपिंग सिस्टिमचा पुरवठा आणि स्थापना करणे. | ३८,५०,२८८/–<br>४२,०१०/– |
| १०. | ३००००४८८६३<br>टीएम | स्टील स्ट्रक्चर आणि एमएस ग्लिब्सच्या फॅब्रिकेशन/दुरूस्ती/उभारणीसाठीचा कामाचा करार. (आवश्यक असेल तेव्हा.) | ४,९८,५७३/–<br>८,४९०/– |
| ११. | ३००००४८८२४<br>ओडीपी | ओडीपी २ येथे दैनंदिन देखभाल दुरूस्तीच्या कामांसाठी ऑटोरिक्षा सेवा देण्यासाठी वार्षिक कंत्राट. | ३,०७,३६६/–<br>६,५८०/– |
| १२. | ३००००४८८१५<br>ओडीपी | एओएच दरम्यान युनिट ५ च्या ईएसपी, एपीएच आणि इकॉनॉमायझर हॉपर्रसाठीचे थर्मल इन्सुलेशन काढणे, प्रदान करणे आणि लावण्याचे काम. | ३२,७१,६४९/–<br>३६,२२०/– |
| १३. | ३००००४८८६७<br>सिव्हिल | राख बंधाऱ्यासह डब्ल्यु डब्ल्यु आर पंपाच्या दिशेने डब्ल्युबीएम रस्त्याचे बांधकाम. | ६,३१,३१४/–<br>९,८२०/– |
| १४. | ३००००४८८७७<br>टेस्टींग | संच क्र. ५ च्या भांडवल दुरूस्तीदरम्यान "AREVA" बनावटीचे "MICOM" श्रेणीचे रिले (Relay) चाचणी करण्याचे कंत्राट | ६,२५,०००/–<br>९,७५०/– |
| १५. | ३००००४८८७६<br>ईएम | संच क्र. ३/५ च्या भांडवल दुरूस्तीदरम्यान एल.टी. ट्रान्सफॉर्मरचे ऑईल फिल्ट्रेशन आणि सर्व्हिसींगच्या कामाचे कंत्राट. | ३,१३,८१३/–<br>६,६४०/– |
| १६. | ३००००४८८८२<br>ईएम | संच ३/५ च्या भांडवल दुरूस्तीदरम्यान वेल्डिंग नेटवर्क देखभाल करण्याच्या कामाचे कंत्राट. | १,७५,८३१/–<br>५,२६०/– |
| १७. | ३००००४८८८०<br>ईएम | इलेक्ट्रिकल मेन्ट २ येथे युनिट क्रमांक ३/५ भांडवल दुरूस्तीदरम्यान ईएसपीच्या कामासाठीचे कंत्राट. | ५,५०,३३१/–<br>९,००३/– |
| १८. | ३००००४८८७८<br>ईएम | धरणाच्या गेटला विज पुरवठयात बिघाड झाल्यास एकलहरे धरणाच्या गेटला पाणी कमी करण्यासाठी २५ केव्हीए डीजी सेट नेमण्याचे कंत्राट. | ४,५६,६१८/–<br>८,०६६/– |
| १९. | ३००००४८८६६<br>डब्लटीपी | टोनर्समध्ये क्लोरिन गॅस भरून पुरवणे. | २०,७०,०००/–<br>२४,२००/– |
| २०. | ३००००४८८९७<br>सीएचपी | सीएचपी २ आणि ३ येथे बूम स्टेकर / स्टेकर रिक्लेमर आणि कन्व्हेयर १७ ए/बी ट्रिपर ट्रॉलीसाठी सीआरडी केबलसची खरेदी. | १४,४४,०००/–<br>१७,९४०/– |

प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/–, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे

## मोफा अधिनियमातील (नियम ११(९)(ई) च्या फॉर्म/XIII नुसार जाहीर सूचना

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर (३)**
**सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालय**
**महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट्स ॲक्ट, १९६३ च्या कलम ५ए अंतर्गत**
**म्हाडा बिल्डिंग, तळमजला, रूम नं. ६९, बांद्रा (पूर्व), मुंबई– ४०००५१.**

जा.क्र.जिउनि–३/मुंबई/ मानीव अभिहस्तांतरण/जाहीर नोटीस/१५९५/२०२४ दि. २८.०५.२०२४

महाराष्ट्र मालकी सदनिका (बांधकाम प्रवर्तन, विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण विनियमन) कायदा, १९६३ च्या कलम ११ अंतर्गत मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज

### जाहीर सूचना
### अर्ज क्र. ७९/२०२४

**एव्हरेस्ट चेंबर्स प्रिमिसेस को–ऑपरेटिव्ह सोसायटी लि.,** सीटीएस क्र. ७९४ अ. ७९४(१), ७९४(२), ७९४(३), ७९४(४) आणि ७९४(५), स्टार टी.व्ही. कार्यालयाजवळ, मरोळनाका अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई – ४०००५९. .... **अर्जदार विरुद्ध. (१) श्री. मोहनदास नानोमल झाम (मृत्यू झाल्यापासून) त्याच्या कायदेशीर वारसांद्वारे (१) (अ) श्री. प्रेम मोहनदास झाम (१) (ब) श्री. दिलीप मोहनदास झाम, (१)(क) श्री. मोती मोहनदास झाम (प्रथम मालक) (२) श्री. हसनंद नानोमल झाम (मृत्यूपासून) त्याच्या कायदेशीर वारसांद्वारे (२)(अ) श्री. हरी हसनंद झाम, (२)(ब) श्री. राजन हसनंद झाम, (२)(उ) श्री. अशोक हसनंद झाम (दुसरे मालक ) (३) श्री. तीरथदास नानोमल झाम (मृत्यू झाल्यापासून) कायदेशीर वारसांद्वारे (३) (अ) श्रीमती. सरस्वती टी. झाम, (३)(ब) श्री. ललित टी. झाम (तिसरे मालक)** सर्व विरोधकांचा शेवटचा ज्ञात पत्ता आहे – सीटीएस क्र. ७९४ अ, ७९४(१), ७९४(२), ७९४(३), ७९४(४) आणि ७९४(५), स्टार टी.व्ही. कार्यालयाजवळ, मरोळनाका अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई – ४०००५९ (४) मे . एव्हरेस्ट डेव्हलपर्स, युनिट क्र. १०, इमारत.क्र २ बी, मित्तल इंडस्ट्रियल इस्टेट, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई – ४०००५९. .... **विरोधक** आणि खालील नमूद केलेल्या मिळकतीवर ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी त्यांचे म्हणणे खालील नमूद सुनावणीच्या दिवशी व वेळी हजर राहून सादर करावे. अन्यथा कोणाचीही काहीही हरकत नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मालमत्तेचे वर्णन :–**

| दावा केलेले क्षेत्र |
|---|
| अर्जदार सोसायटीच्या बाजूने, त्यावरील संरचनेसह मुंबई उपनगर जिल्ह्यातील मरोळनाका, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई – ४०००५९ येथील धारक सीटीएस क्र. ७९४ अ, ७९४(१), ७९४(२), ७९४(३), ७९४(४) आणि ७९४(५), जमिन मापित ३३९६.८० चे एकतर्फी जमिनीचे अभिहस्तांकन. |

वरील प्रकरणाची सुनावणी **दि. १३.०६.२०२४** रोजी **दु. ३.०० वाजता.**

शिक्का

सही/–
(राजेंद्र वीर)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई शहर (३),
सक्षम प्राधिकारी मोफा,
१९६३ च्या कलम ५ ए अंतर्गत

## मोफा अधिनियमातील (नियम ११(९)(ई) च्या फॉर्म/XIII नुसार जाहीर सूचना

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर (३)**
**सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालय**
**महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट्स ॲक्ट, १९६३ च्या कलम ५ए अंतर्गत**
**म्हाडा बिल्डिंग, तळमजला, रूम नं. ६९, बांद्रा (पूर्व), मुंबई– ४०००५१.**

जा.क्र.जिउनि–३/मुंबई/ मानीव अभिहस्तांतरण/जाहीर नोटीस/१५९६/२०२४ दि. २८.०५.२०२४

महाराष्ट्र मालकी सदनिका (बांधकाम प्रवर्तन, विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण विनियमन) कायदा, १९६३ च्या कलम ११ अंतर्गत मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज

### जाहीर सूचना
### अर्ज क्र. ७८/२०२४

**शोले प्रिमायसेस को–ऑप. सोसायटी लि.,** गाव वर्सोवा, सेव्हन बंगला, वर्सोवा, अंधेरी पश्चिम, मुंबई– ४०००६१ येथील खाजगी योजनेचा भाग प्लॉट क्र.९५अ आणि ९१ चा धारक प्लॉट क्र. ५०,५१, ५३ आणि ५४ आणि संबंधित सीटीएस क्र.१३०१/७, नोंदणी उपजिल्हा वांद्रे, जिल्हा मुंबई उपनगर मधील शोलाव प्रिमायसेस को–ऑपरेटिव्ह सोसायटी लि., सात बंगले, वर्सोवा, अंधेरी दक्षिण सेलसेट, ... **अर्जदार वि. (१) मे. सी व्ह्यू कन्स्ट्रक्शन कंपनी. मोफा करारानुसार भागीदारी भागीदारांद्वारे भागीदारी फर्म (ए) मिस मॅग्डालीन फरेरा (बी) श्रीमती मफ्रान्सिस्का फरेरा, (सी) श्री सुरेश लचमनदास रहेजा, (डी) श्री जोसेफ स्टॅनिस्लॉस डिसोझा प्रॉपर्टी रजिस्टर कार्डनुसार. (ई) श्री. सेनेन जेम्स अँथनी डिसोझा, (एफ) श्री. जोसेफ व्हॅन डिसोझा,** अर्जदार क्र. ०१ ते १ (एफ) चा एकत्रित पत्ता – कन्स्ट्रक्शन हाऊस, २४१११ रोड, खार पश्चिम, मुंबई –४०००५२. .... **विरोधक** आणि खालील नमूद केलेल्या मिळकतीवर ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी त्यांचे म्हणणे खालील नमूद सुनावणीच्या दिवशी व वेळी हजर राहून सादर करावे. अन्यथा कोणाचीही काहीही हरकत नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मालमत्तेचे वर्णन :–**

| दावा केलेले क्षेत्र |
|---|
| अर्जदार सोसायटीच्या बाजूने सेव्हन बंगले, वर्सोवा, अंधेरी वेस्ट, मुंबई– ४०००६१ येथे असलेल्या भूखंड क्र. ९५अ आणि ९१ च्या खाजगी योजनेच्या भूखंड क्र. ५०, ५१, ५२., ५३ आणि ५४ भाग असलेल्या जमिनीच्या भूखंडाचे सर्व ते अंगीकृत भागाच्या संबंधात मालमत्ता नोंदणी कार्डनुसार मापित २१८४.१० चौरस मीटर किंवा तेवढेच आणि संबंधित सीटीएस क्र. १३०१/७, मोजमापित २१८४.१० चौ. मीटर. २६१२.२३ चौरस यार्ड किंवा तेवढेच आणि मालमत्ता नोंदणीकृत कार्डांनुसार, त्यावर बांधण्यात आलेल्या इमारती आणि संरचनेसह आणि सामान्य सुविधांच्या फायद्यांवरील हक्क, अधिकार आणि हित आणि उक्त खाजगी लेआउट आणि एमसीजीएम द्वारे अधिग्रहित केलेले किंवा अधिग्रहित केले जाणारे सेट बॅक क्षेत्राचे आरक्षण, जर असेल तर, जमिनीचे अभिहस्तांकन . |

वरील प्रकरणाची सुनावणी **दि. १३.०६.२०२४** रोजी **दु. ३.०० वाजता.**

शिक्का

सही/–
(राजेंद्र वीर)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई शहर (३),
सक्षम प्राधिकारी मोफा, १९६३ च्या कलम ५ ए अंतर्गत

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

## ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

सीआयएन : U67100TZ2014PTC020363, कॉर्पोरेट कार्यालय : कोहिनूर स्क्वेअर, ४७वा मजला, एन.सी. केळकर मार्ग, आर.जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८, ई-मेल : zuber.khan@omkaraarc.com/rajesh.jumani@omkaraarc.com
प्राधिकृत अधिकारी : मोबा. क्र. : +९१८६५७९६९२३१/+९१८६५७९६९२३३

(परिशिष्ट : ४–ए) (नियम ८ (६) सहवाचन ९ (१)च्या तरतुदी पाहा)

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलावासाठी जाहीर सूचना**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (''सरफेसी कायदा'') सहवाचन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८ (६) सहवाचन ९ (१) च्या तरतुदी याअंतर्गत स्थावर संपत्तींच्या विक्रीकरिता ई–लिलाव विक्री सूचना**

सर्वसामान्य जनतेस व विशेषत: खालील निर्देशित कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण/प्रभारित खालील निर्देशित स्थावर मालमत्ता ज्यांचा ताबा ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला. पुढे ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (ओएआरपीएल) (ओमकारा पीएस ३०/२०२१–२२ ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून आपल्या क्षमतेत कार्यरत) यांनी इंडसइंड बँक लि. (अभिहस्तांकनकार बँक) यांच्याकडून अभिहस्तांकनकार बँकेकडून खालील निर्देशित प्रतिभूर्तीसमवेत अभिहस्तांकन करार दि. ३०.०९.२०२१ अंतर्गत खालील खात्यातील संपूर्ण थकीत कर्जाचे संपादन केले. त्यानुसार ओएआरपीएल यांनी अभिहस्तांकनकार बँकेच्या अधिकारांचा ताबा घेतला असून, थकबाकींची वसुली करण्याचा व प्रतिभूतींवर ताबा घेण्याचा अधिकार प्राप्त केला. ओएआरपीएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खालील निर्देशित प्रतिभूत मालमत्तेचा कर्जदार–गहाणवटदार–सहकर्जदारांकडून प्रत्यक्ष ताबा सुपूर्द केला आहे. ओएआरपीएलचे प्राधिकृत अधिकारी हे ओएआरपीएल–प्रतिभूत धनको म्हणून संबंधित कर्जदार व सहकर्जदारांकडून थकीत असलेल्या खालील रकान्यात दर्शविलेल्या रकमेच्या वसुलीकरिता थकीत कर्जाच्या वसुलीसाठी सरफेसी कायद्याच्या नियम १३ (२) आणि (४) अंतर्गत खालील निर्देशित प्रतिभूतींची ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जी आहे'', ''जी काही आहे तेथे आहे'' व ''विनाअडथळा तत्त्वावर'' विक्री करू इच्छित आहेत. कर्जदार/हमीदार/गहाणवटदार, प्रतिभूती, मालक, थकीत देणी, अनु. १३ (२) अंतर्गत पाठविलेल्या मागणी सूचनेचा दिनांक, ताबा दिनांक, राखीव मूल्य, बोली विस्तार रक्कम, इसारा रक्कम ठेव (इरठे), परीक्षण दिनांक व वेळ आदी तपशील खालीलप्रमाणे आहे :

| अ क्र. | कर्जदार/हमीदार/गहाणवटदार यांचे नाव | प्रतिभूत संपत्तीचा तपशील | मालकाचे नाव | ०९.०५.२०२४ रोजीनुसार थकीत रक्कम (रु.) | मागणी सूचना दिनांक | ताबा दिनांक | राखीव मूल्य (रु. लाखांत) | बोली विस्तार रक्कम | इरठे | परीक्षण दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. बालाजी इंडस्ट्रीज (कर्जदार)<br>श्री. राधेश्याम अग्रवाल (हमीदार/गहाणवटदार)<br>श्रीमती निशा अग्रवाल (हमीदार/गहाणवटदार) | युनिट क्र. डी–२९/डी–३०, पहिला मजला, साईनाथ इंडस्ट्रीयल इस्टेट, सर्व्हे क्र. ६३/२, मौजे खोणी, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे–४२१ ३०८.<br>मोजमापित क्षेत्र : युनिट डी–२९–१८३१.५ चौ.फूट व युनिट डी–३०–१८८७ चौ.फूट | श्री. राधेश्याम अग्रवाल, श्रीमती निशा अग्रवाल | रु. ६७३.२९ लाख | २४.०१.२०१९ | ०६.०६.२०२३ | रु. ४४,००,०००/–<br>(रु. चव्वेचाळीस लाख मात्र) | रु. २५,०००/– | रु. ४,४०,०००/–<br>(रु. चार लाख चाळीस हजार मात्र) | १४.०६.२०२४ रोजी दु. ३.०० वा. ते सायं. ४.०० वा. |

**खाते क्र. : ०५५५०५०१०२२१, लाभार्थी नाव : ओमकारा पीएस ३०/२०२१–२२ ट्रस्ट, बँकेचे नाव : आयसीआयसीआय बँक, शाखा : वांद्रे (पू.), मुंबई, आयएफएससी कोड : आयसीआयसी००००५५५**

**ई–लिलाव दिनांक व वेळ : दि. २७.०६.२०२४ रोजी दु. १२.०० ते दु. २.००** | **सहभागासाठी बोली पत्र/केवायसी दस्तावेज/इरठेचा पुरावा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ : दि. २५.०६.२०२४ रोजी सायं. ६.०० पर्यंत**

**लिलाव अटी व शर्ती : विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया प्रतिभूत धनकोंची (ओएआरपीएल) वेबसाइट अर्थात** http://omkaraarc.com/auction.php **वर दिलेली लिंक किंवा सेवा प्रदात्यांची वेबसाइट** http://www.bankeauction.com **येथे भेट द्यावी.**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८ (६) सहवाचन नियम ९ (१) अंतर्गत विक्रीची वैधानिक सूचना**

सदर सूचना ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८ (६) सहवाचन नियम ९ (१) अंतर्गत तसेच सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत वरील निर्देशित कर्ज खात्याच्या कर्जदारांसाठी कमाल १५ (पंधरा) दिवसांच्या कालावधीकरिताची अनिवार्य सूचना आहे, ज्याअंतर्गत त्यांना सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी वरील निर्देशित तारीख व वेळेवर लिलाव–विक्री आयोजित करण्यासंदर्भात सूचित करण्यात येत आहे.

दिनांक : २९.०५.२०२४
ठिकाण : भिवंडी, मुंबई

सही/– प्राधिकृत अधिकारी, ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
(ओमकारा पीएस ३०/२०२१–२२ ट्रस्टच्या ट्रस्टींच्या क्षमतेत कार्यरत)